दि. ०४/०३/२०११

# एन.एफ.टी.ई. (बी.एस.एन.एल.)

## महाराष्ट्र सर्कल, मुंबई

## **<u>सावधान, कॉम्रेड्स, सावधान !</u>**

प्रति,
सर्व जिल्हा सचिव,
सर्व शाखासचिव,
सर्व परिमंडल अधिकारी,
प्रिय साथी,

दि. १ फेब्रुवारी २०११ रोजी झालेल्या ५ व्या मेंबरशिप व्हेरिफिकेशनमध्ये बी.एस.एन.एल.ई.यु. ला १,०६,००० तर एन.एफ.टी.ई. ला ८०,००० मते मिळालीत. आपण मद्रास उच्च न्यायालयात तर एन.एफ.टी.ओ. ने केरळ उच्च न्यायालयात याचिका दाखल केलेली आहे. ६० वर्षांपूर्वीचे कालबाह्य कोड ऑफ डिसीप्लीन बदलावे व सर्व संघटनांना ट्रेड युनियन फॅसिलिटीज् मिळाव्यात ही मागणी आहे. ५ व्या व्हेरिफिकेशनमध्ये सर्वाधिक मते मिळविणाऱ्या संघटनेलाही ५१% मते मिळालेली नाहीत. अशा परिस्थितीत ३५% मते मिळालेल्या एन.एफ.टी.ई. ला २ री युनियन म्हणून मान्यता मिळावी अशी मागणी आपण मा. दूरसंचार मंत्री, मा. श्रम आयुक्त व मा. सी.एम.डी. यांचेकडे केलेली आहे. ''नेवेली कॉर्पोरेशन'' या अन्य पी.एस.यु. मध्ये अगदी अशीच मते मिळालेल्या दोन संघटनांना मान्यता (न्यायालयीन आदेशाने) मिळालेली आहे. तेव्हा यावेळी दुसरी युनियन म्हणून आपल्याला मान्यता मिळेल, हे निश्चित आहे. अशी मान्यता मिळाल्यानंतर कर्मचाऱ्यांचे प्रश्न व्यवस्थापनासमोर मांडून सोडविण्यासाठी व्यासपीठ व अन्य किमान सुविधाही मिळतील यात शंका नाही.

सतत ४ निवडणूका हरल्यानंतर कार्यकर्ते/सभासद निराश होणे स्वाभाविक आहे. त्यामुळे वैफल्यग्रस्त होऊन मान्यताप्राप्त संघटनेकडे जाण्याचा विचार काही ठिकाणी सुरु आहे. काही ठिकाणी तसा निर्णयही घेतला आहे. पण ही सी.एच.क्यू./सर्कल युनियनची भूमिका नाही. तसेच दि. २७/०२/२०११ रोजी मुंबई येथे झालेल्या बैठकीत सर्व जिल्हा सचिवांनी एकमताने ठरविले आहे की, कोणत्याही परिस्थितीत एन.एफ.टी.ई. कार्य करीत राहील.

सातारा जिल्ह्यातील एन.एफ.टी.ई. शाखा बी.एस.एन.एल.ई.यु. मध्ये विलीन करण्याचा निर्णय तेथील साथींनी घेतला आहे. सर्कल युनियन त्यांच्या सतत संपर्कात असून त्यांचे मतपरिवर्तन करण्याच्या प्रयत्नात आहे. दि. ०३/०३/२०११ रोजी कॉ. रमेश आयरे, कॉ. के. एस. कुलकर्णी, कॉ. आर. जी. मुळे, कॉ. एच. एल. मोकताली, कॉ. भस्मे, कॉ. पी. ए. जोशी, कॉ. सी.एच. जगताप, कॉ. संजय कुलकर्णी यांनी सातारा येथे जाऊन सर्व प्रमुख कार्यकर्त्यांशी सविस्तर चर्चा केलेली आहे. तेथील सर्व साथी आपल्या निर्णयाचा फेरविचार करतील अशी आशा आहे.

कॉम्रेड्स, एन.एफ.टी.ई. चे कार्य आपण जाणतात तसेच बी.एस.एन.एल.ईय.यु. ने गेल्या ६ वर्षात काय वाट लावली आहे तेही आपण जाणतात. वेज रिव्हीजन, प्रमोशन पॉलिसी, बोनस, ट्रान्सफर. आय.पी.ओ., व्ही.आर.एस. या सर्वात त्यांची भूमिका स्पष्ट झाली असून ती कामगार व कंपनी दोघांच्याही हिताची नाही. आता फक्त दहशत, दबाव, प्रलोभने इ. तंत्र वापरुन सभासद वाढविणे एवढाच एक कलमी कार्यक्रम त्यांचेकडे आहे.

धैर्य कायम ठेवा, संयम कायम ठेवा. बी.एस.एन.एल. व कर्मचारी यांचे संरक्षण ही आपली जबाबदारी आहे व आपण ती यशस्वीपणे पार पाडू हा विश्वास बाळगा !

शुभेच्छांसह ...

आपला साथी,

**(रमेश आयरे)**
परिमंडळ सचिव, मुंबई